# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक १६.०७.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १५.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ९,०२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून १३,८६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१४३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,७७,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २१.०५.२०२६ चे ०२.०० वा. ते ११.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत प्लॉट क्र. ७४, फ्रेन्डस् कॉलनी, दीनदयाल नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी शब्बीर जोयेब शाकीर वय २२ वर्षे यांनी त्यांचे राहते घराचे वॉलकंपाऊंड लगत त्यांची केटीएम डयुक गाडी क्र. एम.एच. ३१ ईव्ही १९५४ किंमती १,५०,०००/—रू. ची ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून, आरोपी नामे ओम उर्फ रवि नरेंद्र येडे वय २१ वर्ष रा. गाडीखाना मैदानाजवळ, बोंद्रेचे घरी किरायाने, गणेशपेठ, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे सुमित संतोष कलिमती वय १९ वर्षे रा. शितला माता मंदीरमागे, टिबी वार्ड परिसर, इमामवाडा, नागपूर याचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे १,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी राणा प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— अग्निशस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.०७.२०२६ रोजी १८.१५ वा. ते १९.३५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शहरात गुन्हेगार शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, गांधीसागर तलावाचे भिंतीलगत मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसल्याने, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद सोहेल मोहम्मद साबिर वय २६ वर्षे रा. भुतिया दरवाजा, दसरा रोड, महाल, नागपूर असे सांगितले. त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र व ०२ जिवंत काडतुस मिळुन आल्याने एकुण किंमती ३४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्निशस्त्र जिवंत काडतुससह बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ३,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गणेशपेठ पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि शिवाजी ननवरे, नापोआ शेषराव राऊत, पोअं. अश्विन मांगे, समिर शेख, कुणाल मसराम यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे खापरखेडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०७.२०२६ चे १९.३० वा. ते २०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे पती नामे यशवंत चंदेल वय २८ वर्ष रा. प्लॉट क्र. ७२, वैष्णवी माता नगर, पिपळा रोड, हुडकेश्वर, नागपूर हे त्यांचे आय २० कार क्र. एमएच २० बीएन ५०७९ मध्ये फिर्यादी तसेच त्यांची बहीण व आई व मुलगी यांचेसह पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत दहेगाव सनराईज हॉटेल समोरुन जात होते, डिव्हायडर जवळून वळण घेतांना डिव्हायडरचे बाजुने येणाऱ्या स्विफ्ट कार क्र. एमएच २७ बीई ६१६३ चे चालकाने इंडीकेटर न देता, वळण घेतांना त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पतीचे कारला जोरात धडक दिल्याने कारमधील फिर्यादीचे पती व इतर नातेवाईक जखमी झाले. गंभीर जखमी फिर्यादीचे पतीला उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. इतर जखमींचा उपचार करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे खापरखेडा येथे प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला होता. दिनांक १५.०७.२०२६ रोजी फिर्यादी श्रीमती दुर्गा यशवंत चंदेल वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. ७२, वैष्णवी माता नगर, पिपळा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि अमोल पाटील ९२०९९२३५४४ यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),१२५(अ),१२५(ब) भा.न्या. सं., सहकलम १३४,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हिंगणा :–** दिनांक १६.०७.२०२६ चे ०१.०० ते ०२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, डोंगरगाव गुरुद्वाराजवळ एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे, आयशर गाडी क्र. एमएच ०४ ईवाय ८६१० चे चालक असून नागपूर कडून वर्धा रोडकडे जात असतांना, अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्यांना, एम्स हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि. गायत्री चव्हाण ९९७०३१७८७२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे तहसील:– सौ.** चित्रा पांडुरंग चांदेकर वय ३८ वर्षे, रा. टिमकी, रंभाजी रोड, चांदेकर मंदीरजवळ, नागपूर ह्या दिनांक ११.०७.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता मुलगा नामे विश्वास याचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे लांब, अंगात–पांढरे रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. मुलाचे वर्णन रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची ३ फुट, अंगात–पांढरा शर्ट व काळा पॅन्ट घातलेला आहे.

**२) पोलीस ठाणे हडकेश्वर:– सौ.** संगिता सागर श्रीवास वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४२, श्रीराम चौक, न्यु नरसाळा रोड, नागपूर ह्या दिनांक १३.०७.२०२६ रोजी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता मुलगी नामे सृष्टी वय २ वर्ष हिचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ५ इंच, केस–काळे लांब, अंगात–पांढरे रंगाचा कुर्ता व काळी लॅगीन घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

मुलीचे वर्णन रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची २ फुट, अंगात—पांढरा टिशर्ट व निळा पॅन्ट घातलेला आहे.

**३) पोलीस ठाणे तहसील:—** सानिया शब्बीर शेख वय २० वर्षे, रा. नालसाब चौक, चुना मस्जिद, तकीया दिवाणशाह, नागपूर ह्या दिनांक १३.०७.२०२६ रोजी ०६.०० वा. चे सुमारा पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, डोळे—काळे, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे लांब, अंगात—सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात.

**४) पोलीस ठाणे तहसील:—** रवि कैलास म्हैसकर वय ४६ वर्षे, रा. रमाबाई आंबेडकर चौक, कंट्रोल वाडी, नागपूर ह्या दिनांक १२.०७.२०२६ रोजी ०२.०० वा. चे सुमारा पोलीस ठाणे तहसील हद्दीतील मेयो हॉस्पिटल येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, डोळे—काळे, उंची—५ फुट ७ इंच, केस—काळे, अंगात—निळा टिशर्ट व कत्था रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी हिंदी बोलतात.


चित्रा


विश्वास


संगिता


सृष्टी


सानिया


रवि

(इतर)

**पोलीस ठाणे कोतवाली येथील बेवारस वाहना बाबत वाहन मालकांना सुचना :—**

पोलीस ठाणे कोतवाली नागपुर शहर, येथे बेवारस (लावारिस विना दाव्याचे दुचाकी वाहने) दुचाकी वाहने जमा आहेत. खालील यादी प्रमाणे एकुण ६२ वाहने असुन, त्या वाहनाकरीता पो. ठाणे कोतवाली येथे कोणीही दावा केलेला नाही, या वाहनाचे मालक अद्याप मिळुन आलेले नाही. नमुद दुचाकी वाहनांबाबत पुढील कारवाई करणे असल्याने, खालील यादीतील वाहनांचे मालकांनी पोलीस ठाणे कोतवाली येथे १५ दिवसाचे आत येवुन, आपली वाहने घेवुन जावे. अन्यथा त्यांचे काहीही म्हणने नाही, असे गृहीत धरून यातील नमुद वाहनाबाबत लिलावाची प्रक्रीया करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**वाहनाची यादी**

| अ. क | वाहनाचे प्रकार व वाहन क. | अ. क | वाहनाचे प्रकार व वाहन क | अ. क | वाहनाचे प्रकार व वाहन क |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ACTIVA<br>MH-31-W 4663 | 22 | TVS VICTER<br>MH-31 –BN-3929 | 43 | BAJAJ DISCOVER<br>MH-40 –AE-1499 |
| 2 | ACTIVA<br>MH-31-BU 6949 | 23 | ZAYLO<br>MH-31 –AT-0102 | 44 | LUNA<br>MH-31-BR-9157 |
| 3 | PASSION PRO<br>MH-31-DQ 0212 | 24 | PULSER<br>MH-32-G- 2154 | 45 | SCOOTY ES<br>MH-31-AB-1896 |
| 4 | PASSION PRO | 25 | SUNNY | 46 | CD-100 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | NO NUMBER | | MH-31-7927 | | MVF-7864 |
| 5 | YAMAHA<br>MH31-VS 1909 | 26 | SCOOTY ES<br>MH-31 –AQ-6510 | 47 | SCOOTER<br>MH-12-AA -706 |
| 6 | SCOOTY PEP<br>MH-31-CE 8446 | 27 | CD-100<br>MH-31 –X-9358 | 48 | SCOOTER<br>MH-31-BG -320 |
| 7 | SPLENDER<br>MH-31-BW 0174 | 28 | SCOOTER<br>MAG-947 | 49 | SCOOTER<br>MH-31-AK -9685 |
| 8 | PULSER<br>MH-36-P- 151 | 29 | SUZUKI SAMURAI<br>MH-34-E-9444 | 50 | LUNA<br>MH-31-L-7141 |
| 9 | AVIATAR<br>MH-31-DQ- 5579 | 30 | SCOOTER<br>MTE-5395 | 51 | ACTIVA<br>NO NUMBER |
| 10 | PULSER<br>MH-31-BM- 3038 | 31 | SCOOTY<br>MH-31-BO-3450 | 52 | LUNA<br>NO NUMBER |
| 11 | SCOOTY -PEP<br>MH-31-BG -7280 | 32 | SCOOTAR<br>MH-31-A-6758 | 53 | SCOOTY PEP<br>MH-31-AU-2837 |
| 12 | SCOOTY -PEP<br>MH-31-BV -8022 | 33 | SPLENDER<br>MH-36-D-3374 | 54 | LUNA<br>NO NUMBER |
| 13 | CD 100<br>MH-40-AW -7230 | 34 | KINETIC HO<br>MH-31 –C-5174 | 55 | LUNA<br>NO NUMBER |
| 14 | CD 100<br>MFW-7879 | 35 | LUNA<br>MVJ--2001 | 56 | SCOOTY PEP<br>MH-31-CD-6615 |
| 15 | SPLENDAR<br>MH-31-BH 7328 | 36 | SPLENDER<br>MH-31-5603 | 57 | SPLANDER<br>MP-51-MB-1540 |
| 16 | SPLENDER<br>MH-31-AR 5573 | 37 | SPLENDER<br>MH-40-B- 6348 | 58 | PULSER<br>MH-31-DY-5132 |
| 17 | PASSION PLUS<br>MH-31 BL -5405 | 38 | YAMAHA<br>MH-31-BC-5070 | 59 | SCOOTER<br>MH-31-A-6639 |
| 18 | SCOOTER<br>MH-31-B- 0842 | 49 | LUNA<br>NO NUMBER | 60 | SCOOTER<br>MH-31-N-1502 |
| 19 | SPLENDAR<br>MH-31-BM 7809 | 40 | SPLENDER<br>MH-31-AS-9881/8625 | 61 | CD-100<br>NO NUMBER |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | PULSAR<br><br>MH-36-E- 6859 | 41 | CD-100 RED<br><br>NO NUMBER | 62 | LUNA<br><br>NO NUMBER |
| 21 | PASSION PRO<br><br>MH-31 –VS-3351 | 42 | AVENGER<br><br>MH-31-EJ-0177 | | |

सदर वाहनाबाबत कोणत्याही व्यक्तीच्या दावा असल्यास त्यांनी नमुद मालमत्तेवरील आपला मालकी हक्क सदरची नोटीस प्रसारित केल्याचे तारखेपासुन १५ दिवसाचे आत पोलिस ठाणे कोतवाली येथे योग्य कागदपत्रासह हजर राहुन सिद्ध करावा, १५ दिवसाचे नंतर सदर वाहनाबाबत कोणताही कायदेशिर दावा स्विकारण्यात येणार नाही,

ज्या वाहनाबाबत विहीत मुदतीत कोणत्याही दावा दाखल करण्यात येणार नाही, अशा वाहनांना बेवारस मालमत्ता समजुन महाराष्ट्र पोलीस अधिनीयम चे कलम ८७ प्रमाणे सदरची मालमत्ता ही सरकार जमा करून त्याची जाहीर लिलावा द्वारे कायदेशिर विल्हेवाट लावण्यात येइल, त्यानंतर सदर मालमत्तेवरील कोणताही दावा/मालकीहक्क/आक्षेप स्विकार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी करीता सर्व नागरिकांना ही सुचना देण्यात येत आहे. नागरिकांनी अधिक माहिती करीता खालील क्रमांकावर संपर्क साधावा,

(१) श्री प्रशांत जुमडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.ठाणे कोतवाली नागपुर शहर मो.नं. ८९७५४७८७००

(२) सफौ. राजेश तितरमारे ब.न. ४३९५ मुद्येमाल मोहरर, कोतवाली नागपूर शहर मो.न. ८८८८८३८९८१

(३) पोलिस ठाणे कोतवाली .91-712-2738284 , +91-712- 273828

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**